दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक १५५ | MAHMAR/2006/17212 | रायगड | शुक्रवार, दि.२२ ऑगस्ट २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## तारापूर एमआयडीसीमध्ये गॅस गळती; एकाच कंपनीतील ४ कामगारांचा मृत्यू, २ गंभीर

**दै.रायगड नगरी | पालघर**

पालघरमधील तारापूर-बोईसर औद्योगिक क्षेत्रातील एका औषध कंपनीत गुरुवारी (२१ ऑगस्ट) दुपारी गॅस गळती झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेत चार कामगारांचा मृत्यू झाला असून, दोन जणांची प्रकृती गंभीर आहे.

गुरुवारी दुपारी अडीच ते तीन वाजण्याच्या सुमारास तारापूर औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट क्रमांक १३ येथील मेडले फार्मा कंपनीत नायट्रोजन रिक्शन टँकमधून गॅसची गळती झाली. या गळतीमुळे एकूण सहा कामगार बाधित झाले. त्यांना तातडीने शिंदे रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान, यातील चौघांचा मृत्यू झाला, तर इतर दोघांची प्रकृती गंभीर असून त्यांना अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले आहे. तर साक्षीदारांचे जबाब घेऊन गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे असे पालघर पोलिसांनी सांगितले आहे.

# गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना टोलमाफी




### सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा महत्त्वपूर्ण निर्णय

**दै.रायगड नगरी | मुंबई**

यंदाच्या गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना मोठा दिलासा मिळाला आहे. सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी २३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर २०२५ या कालावधीत मुंबई-बेंगळूरू राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग, तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील रस्त्यांवरील टोल नाक्यांवर टोलमाफी जाहीर केली आहे. ही सवलत कोकणात जाणाऱ्या सर्व खासगी वाहनांना आणि एसटी बसेसना लागू असणार आहे.

या सवलतीसाठी गणेशोत्सव २०२५ - कोकण दर्शन नावाचे विशेष टोलमाफी पास उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या पासवर वाहन क्रमांक आणि वाहन मालकाची माहिती नोंदवली जाईल. हे पास प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलीस आणि वाहतूक विभागाकडे उपलब्ध असतील. परतीच्या प्रवासासाठीही हेच पास वैध राहील.

या निर्णयामुळे कोकणातील गणेशोत्सव साजरा करण्यासाठी गावी जाणाऱ्या लाखो गणेशभक्तांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. दरवर्षी गणेशोत्सवात कोकणात मोठ्या संख्येने जात असतात. या टोलमाफीमुळे त्यांचा प्रवास अधिक सुलभ आणि खर्चात बचत होणार आहे. मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी गणेशोत्सवाच्या काळात घेतलेल्या या निर्णयामुळे कोकणातील गणेशभक्तांच्या उत्साहात निश्चितच भर पडणार आहे.

# जुना मुंबई-पुणे महामार्गावर बारवाईजवळ ५-६ वाहनांचा भीषण अपघात

**दै.रायगड नगरी | पनवेल**

गुरुवारी दुपारी जुना मुंबई-पुणे महामार्गावर बारवाईजवळ एक भयानक अपघात घडला. या अपघातात ४-५ वाहने एकमेकांवर आदळून थेट रस्त्याच्या कडेला फेकली गेली.



मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक चालक जुना मुंबई-पुणे महामार्गावरून जात असताना बारवाईजवळील एका कठीण वळणावर अचानक वाहनावरील नियंत्रण सुटले व समोरून जात असलेल्या गाड्यांना जोरदार ठोकर मारली. या धडकेत एक रिक्षा, मारुती इको कार, हुंदाई ळ-१० आणि स्कोडा कार यांचा समावेश आहे. अपघात इतका तीव्र होता की, सर्व वाहनांचे प्रचंड नुकसान झाले. या घटनेमुळे महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

अपघाताचा आवाज ऐकून आजूबाजूचे नागरिक आणि स्थानिक लोक तातडीने मदतीसाठी धावले. त्यांनी जखमींना गाड्यांमधून बाहेर काढले आणि पोलिस तसेच रुग्णवाहिकेला माहिती दिली. जखमींना तत्काळ जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आ-हेत. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवित हानी झाली नाही, मात्र जखमींची संख्या आणि त्यांची स्थिती याबाबत अधिक माहिती प्राप्त झाली नाही. स्थानिकांच्या तत्परतेमुळे जखमींना वेळेत वैद्यकीय मदत मिळाली.

या अपघाताचे नेमके कारण अद्याप समोर आ-लेले नाही. ट्रक चालकाने वाहनावरील नियंत्रण कसे गमावले, याबाबत तपास सुरू आहे. महामार्गावर अशा अपघातांची कारणे अनेकदा वेगवान वाहनचालन, रस्त्याची स्थिती किंवा वळणावरील अडथळे असू शकतात, मात्र या प्रकरणात ठोस माहिती मिळालेली नाही. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असून, अपघातग्रस्त वाहनांची नोंद घेण्यात आली आहे. या घटनेमुळे महामार्गावरील सुरक्षिततेबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धा'

**दै.रायगड नगरी | पनवेल**

गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने पनवेल शहरातील मार्केट यार्ड मधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या रायगड जिल्हास्तरीय भजन स्पर्धे चे उदघाटन शनिवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी सकाळी ९. ३० वाजता माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पंडित शंकरराव वैरागकर, बंडाराज घाडगे, नंदकुमार पाटील, ह. भ. प. निवृत्तीबुवा चौधरी, शंकुनाथबुवा पडघेकर, महादेवबुवा शहाबाजकर, सारेगम फेम जितेंद्र तुपे, इंडियन आयडॉल विजेता सागर म्हात्रे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

हि स्पर्धा 'पुरुष खुला गट' आणि 'महिला खुला गट' अशा दोन गटात होणार आहे. स्पर्धेतील प्रथम पारितोषिक ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांक २५ हजार रुपये, तृतीय क्रमांकास १५ हजार रुपये, उत्तेजनार्थ पारितोषिक ७ हजार रुपये, तसेच उत्कृष्ट पखवाज वादक व उत्कृष्ट तबला वादक यांना प्रत्येकी ७ हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह असे आहे. शनिवार आणि रविवार असे दोन दिवस आयोजित या स्पर्धे चा समारोप व पारितोषिक वितरण सोहळा दिनांक २४ ऑगस्टला सायंकाळी ०६. ३० वाजता होणार आहे. या स्पर्धेचा भजनप्रेमी रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री रामशेठ ठाकूर विकास मंडळाचे अध्यक्ष आ.प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा मतदार संघाचे आ.महेश बालदी, श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर व आयोजन समितीने केले आहे.

### मुंबईच्या समुद्रात गुजरात राज्यातील मासेमारी बोट बुडाल्याच्या घटनेने हालचाल

## मोरा बंदरात सापडला गुजरात येथील खलाशाचा मृतदेह

**दै.रायगड नगरी | उरण**



अरबी समुद्रामध्ये गुजरात राज्यातील मासेमारी करणारी बोट बुडाल्याच्या घटनेनं गुरुवारी एकच हालचाल माजली. मात्र प्रशासन अनभिज्ञ असून याबाबतची माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही. दरम्यान ही मासेमारी नौका गुजरात येथील असल्याचे काही कोळी बांधवांकडून सांगण्यात येत आहे. मात्र अपघात कशामुळे झाला, बोटीवर किती खलाशी होते? जिवीत हानी आहे का? किती नुकसान झाले? याबाबत काही खलासा झालेला नाही. मात्र असे असले तरी मुंबई शहराच्या जवळील मोरा बंदरात गुजराती येथील मासेमारी करणाऱ्या बोटीवरील भरत भाई डालकी वय ४४ या खलाशांचा मृतदेह सापडल्याने एकच खळबळ माजली आहे.

गुजरात राज्यातील वेरावल येथील भरतभाई कचराभाई डरी यांच्या मालकीची भवानी गंगा नावाची मच्छीमार बोट वादळी हवामानाच्या इशाऱ्यानंतर सुरक्षिततेसाठी मोरा बंदरात नांगर टाकून विसावली होती. १९ ऑगस्ट २०२५ रोजी मोरा बंदरात आलेल्या या मच्छीमार बोटींवर खलाशी व एक तांडेल असे एकूण सात जण होते. त्या पैकी भरतभाई डालकी हा खलाशी शौचालयाला गेला होता.बराच वेळ झाला तरी बोटीवर दिसून आला नसल्याने त्याचा शोध घेतला मात्र कुठेच आढळून आला नाही.त यामुळे मोरा सागरी पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल करण्यात आली. याप्रकरणी पोलिस व सागरी सुरक्षा रक्षक दलाच्या सदस्यांना बेपत्ता खलाशाचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या गेल्या होत्या. त्या बेपत्ता खलाशाचे शोध घेण्याचे काम सुरु होते. अखेर त्या खलाशाचा मृतदेह गुरुवारी ( दि२२ ) सकाळी सापडला असल्याचे माहिती मोरा पोलीस ठाण्यातून देण्यात आली आहे. परंतु समुद्रात बोट बुडाल्याच्या घटनेनं हालचाल गाजविणाऱ्या व्हिडिओ, वृत्ता संदर्भात प्रशासन अनभिज्ञ असल्याचे समोर येत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

## उरण-नेरूळ रेल्वे प्रकल्पाबाबत सकारात्मक चर्चा लवकरच फेऱ्या वाढणार

**दै.रायगड नगरी | पनवेल**

उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांनी रेल्वे प्रवाशांच्या दृष्टिकोनातून दिल्ली येथे केंद्रीय रेल्वेमंत्री श्री. अश्विनी वैष्णव यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान उरण ते नेरूळ या महत्त्वपूर्ण रेल्वे मार्गाच्या संदर्भात केंद्रातील संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा झाली. प्रवाशांच्या सोयीसाठी लवकरच सध्याच्या ४० फेऱ्यांऐवजी ५० फेऱ्या सुरू करण्यासंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे त्या अनुषंगाने लवकरात लवकरच अंमलबजावणी होणार आहे . यामुळे उरण व नेरूळ परिसरातील प्रवाशांचा दैनंदिन प्रवास अधिक सुकर, सोयीस्कर आणि वेळेवर होणार आहे.

या बैठकीत केवळ रेल्वेमार्ग, फेऱ्या वाढविण्याबाबतच नव्हे, तर प्रवाशांना भेडसावणाऱ्या इतर प्रश्नांवरही सविस्तर आणि सकारात्मक चर्चा झाली. स्टेशनवरील सुविधा, वेळापत्रकातील नियमितता, तांत्रिक अडचणी आणि स्थानिक गरजांबाबत मांडणी करून त्यांचे निराकरण करण्यासाठी लवकरच ठोस पावले उचलली जाणार आहेत. उरण-नेरूळ परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी नेहमीप्रमाणेच मी सातत्याने प्रयत्नशील आहे. या निर्णयामुळे स्थानिक प्रवाशांना दिलासा मिळणार असून रेल्वे सेवेमध्ये लक्षणीय सुधारणा होणार आहे.



# अलिबागमध्ये शिवसेना-शेकापची एकमेकांविरोधात निषेध आंदोलने



**दै.रायगड नगरी | अलिबाग**

मंगळवारी शिवसेना नेत्या, आमदार महेंद्र दळवी यांच्या पत्नी मानसी दळवी आणि शेकापच्या महाराष्ट्र प्रवक्त्या, माजी आमदार जयंत पाटील यांच्या सुनबाई चित्रलेखा पाटील यांच्यातील हातघाई प्रकरण अद्याप शांत व्हायचे नाव घेत नाही. यावरून राजकारण सुरू असल्याचे पहायला मिळाले. शेकाप - शिवसेनेने एकमेकांच्या विरोधात आंदोलने करून निषेध नोंदवला.

सकाळी शेतकरी कामगार पक्षातर्फे शेतकरी भवन समोर शेकापने निदर्शने करण्यात आली. यावेळी मानसी दळवी आणि भाग्यता पाटील यांचा निषेध करण्यात आला. यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ड. मानसी म्हात्रे, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य अनिल पाटील, शेकाप अलिबाग तालुका चिटणीस सुरेश घरत, शेकाप मुरूड तालुका चिटणीस विजय गिदी, अलिबाग तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, शेकाप तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे, शेकाप शहर महिला आघाडी प्रमुख ड. निलम हजारे आदींसह वेगवेगळ्या आघाडीचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चित्रलेखा पाटील यांच्यावरील हल्ला शेतकरी कामगार पक्षाच्या स्वाभीमानावर झालेला हल्ला आहे. समोरून हल्ला करण्याची त्यांची हिम्मत नाही, म्हणून मागून हल्ला करण्याचा डाव केला. संपूर्ण राज्यात शेतकरी कामगार पक्षाची महिला आघाडी आक्रमक म्हणून ओळखली जाते, त्या पद्धतीने निषेध व्यक्त केला पाहिजे. चवळ्या पावळ्यांना महत्व न देता सुरु असलेल्या दंडेलशाही विरोधात लढण्यासाठी सज्ज व्हा असे आवाहन ड. मानसी म्हात्रे यांनी यावेळी शेकाप कार्यकर्त्यांना केले.

या निषेध आंदोलनाला शिवसेनेनेही तितक्याच ताकदीने प्रत्युत्तर दिले. जिल्हा कार्यकारीणीच्या बैठकीनंतर दुपारी शिवसे-नेने निषेध आंदोलन केले. यावेळी मानसी दळवी, महिला आघाडीच्या संपर्कप्रमुख संजीवनी नाईक, जिल्हा प्रमुख राजा केणी,दिलीप भोईर, अलिबाग तालुका प्रमुख अनंत गोंधळी,कामगार नेते दीपक रानवडे,सचिन राऊळ,संदेश थळे, महिला आघाडीच्या भाग्यता पाटील, प्रवक्ता जितेश्री पाटील, आदिंसह शिवसेना पदाधिकारी व शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी काळे झेंडे दाखवण्यात आले.

हा वाद निर्माण व्हायला नको होता. सर्व सामोपचाराने सुरू होते. परंतु दुःखद प्रसंगी ५० खोके हा विषय काढून राजकारण करण्याची गरज नव्हती. शोकाकुल परीव-ाराला आधार देण्याऐवजी तेथे राजकारण सुरू झाले त्यामुळे साहजिकच ही प्रतिक्रिया उमटल्याचे महिला संपर्क प्रमुख संजीवनी नाईक यांनी यावेळी सांगितले.

> काल जे घडलं ते फार खालच्या पातळीवरचे राजकारण होते. कुणाचे नाव न घेता ५० खोके म्हटलं तर कुणाला झोंबण्याचे कारण नव्हते. राजकारणात विरोध असला पाहिजे, चर्चा व्हायला पाहिजे, टीका देखील सहन केली पाहिजे. पण हे घाणेरडं राजकारण मी अनुभवलं आहे. अशा पदाधिकारयांमुळे आमच्या अलिबागची, रायगडची प्रतिमा मलीन होते ही बाब मी एकनाथ शिंदे यांच्या कानावर धालणार आहे.
>
> **– चित्रलेखा पाटील, शेकाप प्रवक्त्या**

> प्रसंग कुठलाही असो चित्रलेखा पाटील नेहमीच ५० खाके म्हणतात .आम्हाला हिणवत असतात. परंतु असे आरोप होवून देखील इथल्या जनतेने महेंद्र दळवी यांच्या सारखा योग्य लोकप्रतिनिधी निवडला. ही संधी इथल्या जनेतेने दिली. शेवटी आम्हालाही मन आहे, भावना आहेत, आत्मसन्मान आहे. त्यामुळे मी माझ्या भाषेत उत्तर दिलं.
>
> **– मानसी दळवी, शिवसेना नेत्या**

# आभाळ फाटले...

गेल्या चार दिवसांच्या मुसळधार पावसाने मुंबईपासून ते विदर्भापर्यंत जवळपास संपूर्ण महाराष्ट्राची केविलवाणी स्थिती करून टाकली आहे, त्याला निसर्गाच्या अवकृपेइतकीच प्रशासन यंत्रणांची निष्क्रियताही कारणीभूत आहे. अतिवृष्टीने मुंबईचे जनजीवन विस्कळित केले, तर मराठवाड्यात नांदेडमध्ये मुखेड तालुक्यात आजवर कधीच झाला नव्हता, इतक्या पावसाने नागरिकांची घरेदारे उद्ध्वस्त करून टाकली. राज्यभरात गेल्या पाच दिवसांत २९ बळी गेले, त्यापैकी ११ मराठवाड्यातील आहेत. राज्यातील अनेक शहरांमध्ये या पावसात रस्त्यांनी ओढ्यानाल्यांचे रूप धारण केले आणि राज्यात ठिकठिकाणी नद्यांनी काठांवरून नागरी वस्त्यांमध्ये धाव घेतली. राज्यातील बारा लाख हेक्टर शेती बाधित झाली असून आता ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होऊ लागली आहे.केवळ सहा तासांत दोनशे मिलिमीटर, तर २४ तासांत साडेतीनशे मिलिमीटर अशा पावसाने मुंबईकरांना २६ जुलै २००५ ची आठवण करून दिली. पावसाच्या या तडाख्यातून कोणीही सुटले नाही. रुळांवर पाणी साचल्याने रेल्वे रद्द झाल्या, रस्त्यांवर साचलेल्या कमरेइतक्या पाण्यात बस-रिक्षासह वाहने अडकली, ' मोनोरेल ' खांबावरच बंद पडून प्रवाशांचे प्राण कंठाशी आले, तर धावपट्टीवर पाणी साचल्याने विमानांनाही हवेतच चकरा माराव्या लागल्या. ही निसर्गाची अवकृपा खरीच; पण केवळ त्याकडे बोट दाखवून राज्यकर्ते आणि प्रशासनाला मोकळे होता येणार नाही. 'मुंबई स्पिरिट'च्या गोंडस नावाखाली दर पावसाळ्यात अनन्वित हाल सहन करणाऱ्या मुंबईकरांची आणखी किती परीक्षा पाहणार, याचे उत्तर देण्याची वेळ आली आहे. रेल्वे स्थानकांवर गर्दीत गुदमरणाऱ्या चाकरमान्यांना आणि घरांत पाणी शिरल्याने उद्ध्वस्त झालेल्या संसाराकडे हताशपणे पाहणाऱ्या मुंबईकरांना 'रेड' किंवा 'ऑरेंज' लर्टविना सरकार काहीही देऊ शकत नाही, ही स्थिती प्रगतिशील महाराष्ट्राला शोभणारी नाही. मिठी नदीतील गाळ काढणे किंवा नालेसफाईचे पितळ या एकाच पावसाने उघडे पाडले. समुद्राला आलेली भरती, हे नैसर्गिक कारण; पण अपुरी ड्रेनेजव्यवस्था आणि मुंबईसह अनेक शहरांमध्ये रस्त्यांवर- गल्लीबोळांमध्ये जागा मिळेल, तेथे काँक्रिट ओतून पाणी जमिनीत मुरण्यास अटकाव करण्याचा अट्टहासही शहरांच्या मुळावर येत आहे. प्लास्टिकच्या कचऱ्यामुळे पाणी वाहून जाण्यास आपण अडथळा निर्माण करीत आहोत, हे नागरिकांनीही लक्षात घेतले पाहिजे. मराठवाड्यातही नांदेड, बीडसह आसपास पावसाने दणका दिला. आयुष्यात इतका पाऊस पाहिला नव्हता, असे मुखेड तालुक्यातील ज्येष्ठ नागरिक सांगतात. तरीही काठावरील गावांचे पुनर्वसन करण्यापूर्वीच लेंडी प्रकल्पाची घळभरणी करण्याच्या घाईमुळे अडवलेले पाणी गावांत शिरून मोठ्या दुर्घटनेला सामोरे जावे लागल्याचा नागरिकांचा आरोप आहे. त्याचीही चौकशी झाली पाहिजे. या पावसाने राज्यातील बारा ते चौदा लाख हेक्टरवरील उभ्या पिकांना फटका बसल्याची प्राथमिक माहिती आहे, तर कोकणातील अनेक गावे दरड कोसळण्याच्या भीतीच्या छायेखाली जगत आहेत. पावसाचा अंदाज देणारी यंत्रणा अधिक अद्ययावत आणि अचूक असणे किती गरजेचे आहे, याची जाणीव या निमित्ताने होते; त्याबरोबरच निसर्गावर किती अतिक्रमण करायचे, याचीही मर्यादा आखून घेतली पाहिजे. राज्यातील अनेक शहरांत थेट नदी-ओढ्यांची पात्रे अडवून-वळवून अतिक्रमण झाले आहे, ठिकठिकाणी डोंगर फोडून केलेली विकासकामे दरडींना निमंत्रण देत आहेत. पश्चिम घाट वाचविण्यासाठी तज्ज्ञ देत असलेल्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करून होणारा हा तथाकथित विकास नागरिकांचा काळ ठरू नये. तसेच या संकटकाळातही राजकारण करण्याची खोड अनेकांना जडली असून 'तुमच्या काळात किती पाणी साठले आणि आमच्या काळात काय झाले,' या आरोप-प्रत्यारोपांना आवर घातला पाहिजे. लष्कर, एनडीआरएफ, सरकार आणि स्थानिक प्रशासन सध्या बचावकार्यात गुंतले आहे. बाधितांची घरेदारे पुन्हा उभी करणे, नुकसानाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा देणे, ही काळाची गरज आहे. राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी विरोधकांनी केली आहे; त्याबाबतही साधकबाधक विचार करून सरकारने तिजोरी खुली करावी. हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडातील भयकारी घटनांनंतर काही दिवसांतच महाराष्ट्रात आलेल्या या पूरस्थितीने हे संकट आपलेही दार ठोठावत आहे, याचे भान ठेवले पाहिजे.

# 'केक वर्ल्ड'चे संस्थापक रोहन दिलीप म्हात्रे यांचे निधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उरणचा धाडसी उद्योजक रोहन दिलीप म्हात्रे यांना कॅन्सरने हिरावून नेले. उरणमधील प्रभावशाली घराण्यात जन्मलेले रोहन म्हात्रे हे केवळ उद्योजक नव्हते, तर ते स्वप्नाळू आणि धाडसी व्यक्तिमत्त्व म्हणून सर्वत्र ओळ-खले जात. लहानपणापासूनच हटके विचार आणि वेगळी शैली हे त्यांचे वैशिष्ट्य होते. कधी कॉलेजचे लेक्चर टाळण्यासाठी खोटं नाटक करणं तर कधी सलमान खानचा चित्रपट लागला की संपूर्ण थिएटर मित्रांसाठी बुक करणे, अशा खोडकर पण लाघवी आठवणी त्यांचे मित्र आजही सांगतात. या साऱ्या रंगतदार आयुष्याच्या मागे समाजासाठी आणि मित्रपरिवारासाठी काहीतरी वेगळं करण्याची त्यांची ओढ होती. माझे मित्रही श्रीमंत झाले तर खरी मजा येते, हे त्यांचे वाक्य आजही स्मरणात आहे.



रोहन म्हात्रे यांची व्यावसायिक आयुष्याची सुरुवात रिअल इस्टेटपासून झाली. द्रोणागिरी प्रकल्पात त्यांनी मॉड्युलर किचन, वाय-फाय अशा त्या काळी अत्यंत दुर्मिळ आधुनिक सोयी दिल्या. प्रकल्प लाँच होताच विकला गेला, मात्र शासकीय अडचणींमुळे त्याला हाव्यवसाय पटला नाही. त्यानंतर त्यांनी जीवन बदलण-ारा उपक्रम हाती घेतला तो म्हणजे 'दी केक वर्ल्ड'. २४ डिसेंबर२०१५ रोजी कामोठे येथे पहिलं केक वर्ल्ड हे शॉप सुरु झालं. खेळण्यांच्या दुकानासारखा दिसणारा स्टोर म्हणजे 'केकवर्ल्ड', प्रत्येक केकसोबत छोटी गिफ्ट अशी नवी संकल्पना ग्राहकांना भुरळ घालणारी ठरली. पहिल्या दिवसापासूनच मोठी गर्दी झाली आणि केक वर्ल्डची गरुड झेप सुरु झाली. एका वर्षात ९ शाखा सुरू झाल्या तर २०२० पर्यंत ७० दुकाने व ४०० कर्मचारी या परिवारात सामील झाले. रोहन यांनी केक वर्ल्डला केवळ दुकान न ठेवता स्टार्टअपसारखे चालवले. रिअल-टाईम सेल्स डेटा, ग्राहकांच्या पसंतीचे विश्लेषण, कर्मचाऱ्यांसाठी परदेशी टूर यांसारख्या योजना त्यांनी राबवल्या. अगदी मर्सिडीज कारमधून केक डिलिव्हरी करण्याचाही त्यांनी विचार केला होता.

कोविड-१९ महामारीच्या कठीण काळात जेव्हा अनेकांनी खर्च कपात आणि कर्मचारी कपातीचा मार्ग निवडला, तेव्हा रोहन यांनी एकाही कर्मचाऱ्याला कमी केले नाही. पगार ही वेळेवर दिले, दुकानांचे भाडेही वेळेवर भरले आणि सर्व जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडल्या. आपण अजून तरुण आहोत, विश्वास निर्माण करायचा आहे, ब्रँड उभा करायचा आहे, अशी त्यांची स्पष्ट भूमिका होती. कोविड-१९ च्याकाळात त्याने नव्या नव्या संकल्पना केल्या, मिठाई चेन, बिर्याणी ब्रँड, शाकाहारी रेस्टॉरंट्स, चिप्स-वेफर्स अशा अनेक उपक्रमांच्या योजना त्यांनी आखल्या होत्या. परंतु २०२२ मध्ये कॅन्सरचे निदान झाल्यानंतर जीवनाने कठोर वळण घेतले. २० हून अधिक प्रक्रिया, दोन मोठ्या शस्त्रक्रिया आणि वेदनादायी उपचार सहन करूनही त्यांचा आत्मविश्वास कायम होता. हॉस्पिटलमध्ये असतानाच त्यांनी आत्मचरित्रात्मक पुस्तक लिहायला सुरुवात केली होती. त्यांच्या निधनानंतर आजही 'केक वर्ल्ड'च्या माध्यमातून त्यांची स्वप्नं जिवंत आहेत. कर्मचाऱ्यांबद्दलची जबाबदारी, समाजासाठी विचार आणि उद्योजकतेतील धाडसी दृष्टिकोन हीच त्यांची खरी ओळख ठरली.

## सततच्या पावसामुळे साप आढळल्याचे प्रमाण वाढले

**दै.रायगड नगरी । उरण**

मागील चार दिवसांपासून उरण तालुक्यात पाऊस वाढला असून, या दिवसांत घराजवळ , रस्त्यावर विविध जातीचे साप आढळून येत आहेत.सततच्या पावसामुळे जमिनीतील बिळांमध्ये पाणी गेल्याने अन्नाच्या शोधात साप बाहेर पडत आहेत.तरी नागरिकांनी स्वतःच्या सुरक्षेसाठी काळजी घेण्यासाठी सतर्क राहावे असे आवाहन सर्प मित्रांकडून करण्यात येत आहे.

पावसाळा सुरू होण्याच्या काळात बऱ्याच जातींच्या सापांचा प्रजननकाळ असतो. बिळामध्ये पाणी साचत असल्याने ते लपण्यासाठी सुरक्षित जागेच्या शोधात असतात.जून-ऑगस्ट या कालावधीत साप मानवी वस्तीच्या आसपास आढळून येतात. म्हणून या काळात नागरिकांनी साप दिसला, तर घाबरून न जाता आपत्कालीन परिस्थितीची शास्त्रीय माहिती घ्यावी, अशी जनजागृती विविध निसर्ग सर्प आणि प्राणीप्रेमी संघटनांतर्फे समाज माध्यमांतून करत आहेत; तसेच शाळा, महाविद्यालयांतही जनजागृती सुरू केली जात आहे.

## मुलीचे अपहरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याप्रकरणी एकावर पनवेल तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

राहुल थडराई हे बारापाडा, पनवेल येथे राहत असून, त्यांची १४ वर्षीय बहीण शाळेत जाते, असे सांगून घरातून निघून गेली आणि परतलीच नाही.

# पिठोरी पूजन (मातृदिन) : संततीसाठी मातृशक्तीची प्रार्थना

भारतीय संस्कृतीत माता हाच सृष्टीचा मूलाधार मानला गेला आहे. संततीचे कल्याण, आरोग्य आणि दीर्घायुष्य यासाठी माता जी उपासना करते, त्यात पिठोरी अमावस्या (म्हणजेच मातृदिन) विशेष स्थान आहे. हा दिवस केवळ धार्मिक व्रत नसून आईच्या निःस्वार्थ भावनेचे व त्यागमय शक्तीचे प्रतीक आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमी

भाद्रपद कृष्ण पक्षातील अमावस्येला पिठोरी अमावस्या पाळली जाते. याची मुळे वैदिक व पुराणकालीन परंपरेत दिसतात.

स्कंद पुराणात व्रतकथेचे वर्णन असून यात संततीचे रक्षण व वृद्धी हा प्रमुख उद्देश आहे.

पिठोरी या शब्दाचा अर्थ पीठापासून घडविलेली मूर्ती. या दिवशी देवीच्या ६४ योगिनींची पीठातील प्रतिकात्मक मूर्ती घडवून त्यांची पूजा केली जाते.

पिठोरी अमावस्या ही स्त्रीप्रधान परंपरा आहे. माता आपल्या मुलांच्या सुरक्षिततेसाठी देवतेचे स्मरण करून निसर्गाशी एकरूप होते.

पूजनकथा

लोकमान्यतेनुसार एकेकाळी एका राणीला अनेक मुलं असूनसुद्धा त्यांचा अकाली मृत्यू होत असे. दुःखाने ग्रस्त राणीला एका ऋषींनी पिठोरी व्रत सांगितले. राणीने पीठापासून ६४ योगिनींच्या प्रतिमा बनवून मातृदेवतेची पूजा केली. तिच्या प्रार्थनेने मुलांचे रक्षण झाले. या कथेवरून पिठोरी पूजन ही परंपरा प्रचलित झाली.

पूजन पद्धती

१. स्नान व संकल्प - स्त्री उपवास करून व्रताचा संकल्प घेते.

२. पीठाची मूर्ती निर्मिती - ६४ योगिनी व मातृदेवता यांच्या पीठातील मूर्ती किंवा प्रतीके बनवली जातात.

३. पूजन व नैवेद्य - फुले, दुर्वा, अक्षता, हळद-कुंकू अर्पण करून देवीला नैवेद्य दाखविला जातो.

४. कथा वाचन - संध्याकाळी व्रतकथा ऐकली जाते.

५. आरती व उद्यापन - देवीची आरती करून व्रताची सांगता केली जाते.

धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व

संततीच्या दीर्घायुष्य, आरोग्य व यशासाठी आईची प्रार्थना.

मातृदेवो भव या वेदवचनाची अनुभूती.

मातृत्वाचा त्याग, माया व जपण्याची भावना अधोरेखित करणारा दिवस.

महिलांच्या एकत्र येऊन केलेल्या सामूहिक पूजनामुळे सामाजिक ऐक्य वृद्धिंगत होते.

आधुनिक संदर्भ

आज पाश्चात्य पद्धतीने मदर्स डे एका दिवसापुरता साजरा होतो. पण आपल्या परंपरेतील पिठोरी अमावस्या हा खरा मातृदिन आहे.

तो केवळ आईवर प्रेम व्यक्त करणारा दिवस नाही, तर आईने मुलांच्या कल्याणासाठी उपवास, प्रार्थना आणि व्रत करणे ही त्याची वैशिष्ट्ये आहेत.

निष्कर्ष

पिठोरी पूजन हा फक्त धार्मिक विधी नसून आईच्या उदात्ततेचे आणि मातृशक्तीच्या सामर्थ्याचे सांस्कृतिक दर्शन आहे. संततीसाठी आई जेव्हा देवीचे स्मरण करून प्रार्थना करते, तेव्हा ती स्वतः देवतेचे रूप धारण करते. म्हणूनच पिठोरी अमावस्या हा दिवस मातृदिन म्हणून भारतीय संस्कृतीत विशेष महत्वाचा ठरतो.



**ज्योती प्रकाश म्हात्रे**
**ग्रंथपाल**
**स्व प्रभाकर पाटील**
**सार्वजनिक वाचनालय**

# राजाभाऊ कोठारी यांच्यासह जिल्ह्यातील चार रक्तदात्यांचा महा रक्तवीर पुरस्काराने दिल्लीत सन्मान

**दै.रायगड नगरी । कर्जत**



आंतरराष्ट्रीय वैश्य महासंमेलन च्या वतीने कर्जतचे सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी, पनवेलचे विजय तांबोळी, कैलास पोटे आणि सतीश पिं-परे यांचा ५० पेक्षा जास्त वेळा रक्तदान केल्याबद्दल महा रक्तवीर पुरस्कार देऊन उप राज्यपालांच्या हस्ते दिल्ली येथे सत्कार करण्यात आला. कोठारी यांनी आज पर्यंत १०९ वेळा रक्तदान केले आहे. तर ५२० रक्तदान सही शिबिरांचे आयोजन करून एकूण ६७ हजार ७७९ रक्त बाटल्या संकलित केल्या आहेत.

आंतरराष्ट्रीय वैश्य महासंमेलन च्या वतीने दिल्ली येथील हॉटेल अशोका मध्ये महा रक्तवीर पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यात्रसंगी १०० पेक्षा जास्त वेळा रक्तदान करणारे कर्जतचे राजाभाऊ कोठारी, पनवेलचे विजय तांबोळी तसेच ५० पेक्षा जास्त वेळा रक्तदान करणारे कैलास पोटे आणि सतीश पिंपरे यांचा लडाखचे उप राज्यपाल कविंद्र गुप्ता यांच्या हस्ते महा रक्तवीर पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी व्यासपीठावर राज्यसभेचे खासदार नरेश बंसल (उत्तराखंड), अशोक मित्तल (पंजाब),श्रीमती धर्मशिला गुप्ता, ( बिहार), सुजित कुमार (ओडिशा), रामेश्वर तेली (आसाम ), लोकसभेचे खासदार दामोदर अग्रवाल ( राजस्थान), सुधीर गुप्ता (मध्यप्रदेश ), डॉ. संजय जयस्वाल ( बिहार), अतुल गर्ग ( उत्तरप्रदेश), ब्रिजमोहन अग्रवाल (छत्तीसगड), सुदामा प्रसाद (बिहार ), मन्नालाल रावतजी (उदयपूर) आदी उपस्थित होते. याप्रसंगी शंभर पेक्षा अधिक रक्तदान करणार्या एकूण १५ रक्तदात्यांना महा रक्तवीर व पन्नास पेक्षा अधिक रक्तदान करणार्या ५२ रक्तदात्यांना रक्तवीर म्हणून सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी माजी खासदार डॉ.अनिल अग्रवालजी राजेंद्र अग्रवाल, आंतरराष्ट्रीय वैश्य महासंमेलनचे अध्यक्ष अशोक अग्रवाल, स्वागत अध्यक्ष. सुनिल गोयल यांच्यासह रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, किसान मोर्चाचे महाराष्ट्र सचिव सुनिल गोगटे, ड. स्व-प्निल पालकर , कैलाश घारे व संदिप पारकर उपस्थित होते.

# रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल तर्फे वनवासी विद्यार्थांची आरोग्य तपासणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल मार्फत गेली ३५ वर्षे सातत्याने वनवासी कल्याण आश्रम चिंचवली येथील विद्यार्थी आरोग्य दत्तक योजना राबविली जात आहे त्या अंतर्गत वनवासी कल्याण आश्रम चिंचवली येथील विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी शिबीर, मोफत औषधे वाटप, खाऊ वाटप, आणि तेथील १० वी च्या विद्यार्थ्यांना उपयुक्त असे Ideal Study -pp चे वाटप करण्यात आले.

उपक्रमामध्ये रोटरी ची जुनी theme Spreading Happiness याचा प्रत्यय आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आंनद खरोखर साठवून ठेवण्या सारखा होता. प्रोजेक्ट चेअरमन डॉ. रमेश पटेल यांनी हा प्रोजेक्ट यशस्वी करण्यासाठी खूप मेहनत घेतली तसेच अल्पोपहाराची खूप छान सोय केली त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. डॉ. तुषार जोशी, डॉ.चंद्रात्रे, डॉ. मिलिंद घरत यांनी विध्यार्थ्यांची तपासणी करून प्रोजेक्ट यशस्वी करण्यात मोठा हातभार लावला. फार्मासिस्ट अँन लीना घोडिंदे यांनी रो. मनोज आंग्रे यांच्या सहकार्याने औषधे वाटप करण्याची जबाबदारी छान पणे पार पाडली. बी जी पाटील यांनी या प्रोजेक्ट बद्दल उपस्थितीताना माहितीपूर्ण मार्गदर्शन केले. PP संतोष घोडिंदे यांनी आपल्या जुन्या आठवणी ना उजाळा दिला. अँनस यांनी खाऊ वाटपाची जबाबदारी चोखपणे पार पाडली. दीपक गडगे आणि डॉ. मिलिंद घरत यांच्या हस्ते अँपचे वाटप करण्यात आले. रो .सुदीप गायकवाड रो .ऋषिकेश धुंदरे, रो .ऋषिकेश जोशीरो. गजानन जोशी, रो .विकेश कांडपिळे, रो.कचरे, सार्जंट योगेश महाजन यांना दिलेली जबाबदारी योग्य रित्या पार पाडली आणि नेहमीप्रमाणेच या शिबिराचे सुयोग्य नियोजन झझ डॉ. लक्ष्मण आवटे यांनी केले. या प्रसंगी अध्यक्ष अनिल ठकेकर, सचिव अतिश थोरात, नियोजित अध्यक्ष दीपक गडगे यांचे सह अनेक अँन्स, अनेटस तसेच वनवासी आश्रम कार्यकर्ते श्री. गाडगीळ हे उपस्थित होते. आजच्या सर्व सदस्यांच्या लक्षवेधक उपस्थितीने Unite For Good ही या रोटरी वर्षाच्या ढहशाश चा पुनप्रत्यय आला.




## पनवेल महानगरपालिका
### शहर अभियंता विभाग
### फेर ई-निविदा सूचना

निविदा सुचना क्र. पमपा/बांधकाम/४३२५/प्र.क्र. ०६/२९४४/२०२५ दिनांक: २१/०८/२०२५

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निम शासकीय (Central Government / State Government/ Government under taking) विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार फेर ई-निविदा (2nd Call) मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (Without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/50/2025-26 | Energy Driven Establishment of Renewable Natural Darft Modern Wood based last Rite location with 3 years System at various maintenance. (2 nd Call) | 5,94,47,886/- |

या कामाच्या ई निविदे दि. २२/०८/२०२५ रोजी प्रसिध्द बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त-I**
**पनवेल महानगरपालिका**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# कोकणी बळीराजाचे अंदाज फोल; तुफान पावसाने शेती पाण्यात

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

यंदाचा पावसाळा कोकणातील बळीराजासाठी मोठे संकट ठरला आहे. पारंपारिक नक्षत्र-वाहनांवर आधारित पावसाचे अंदाज चुकवून पाऊस मे महिन्यापासूनच सुरू झाला. त्यानंतर एखाद-दोन दिवस वगळता रोजच हजेरी लावणाऱ्या संततधार पावसामुळे पावसाळी शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पूरस्थिती, पिकांची नासधूस आणि सततच्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी अक्षरशः हवालदिल झाला आहे.

ग्रामीण भागात शेती आजही नक्षत्र पद्धतीनुसार केली जाते. आश्लेषा, पुनर्वसू, मघा, पूर्वा, उत्तरा या नक्षत्रांतील वाहनांवरून पावसाचे अंदाज वर्तवले जातात. मात्र यंदा सारेच अंदाज फोल ठरले. श्रावण महिन्यात साधारणपणे सूर्यकिरण दिसतात, गोधड्या धुण्याचा- वाळवण्याचा प्रघात असतो; पण यंदा सततच्या पावसामुळे सूर्याचे दर्शन झालेच नाही. सह्याद्रीच्या घनदाट पर्वतरांगा, निसर्गाची हिरवाई आणि विस्तीर्ण भातशेती ही रायगड जिल्ह्याची खरी ओळख आहे. भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रदेशातील शेतकरी प्रामुख्याने पावसाळी भातशेतीवर अवलंबून आहेत. मात्र यंदाच्या तुफानी पावसामुळे या हिरव्या शेतांचे पाणी पाझरले आहे. अनेक ठिकाणी भातशेती पाण्याखाली गेल्याने पिकांचे संभाव्य नुकसान अतोनात आहे. शेतकऱ्यांचे वर्षभराचे कष्ट एका झटक्यात पाण्यात गेल्याने हतबलता वाढली आहे. सततच्या पावसामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. पिके पाण्यात बुडून नष्ट झाली; बळीराजा दोन वेळच्या घासासाठीही महाग झाला आहे. कृषिप्रधान देशात वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे जगणेच बिकट झाले आहे. पारंपारिक अंदाज असो वा हवामान खात्याचे तांत्रिक भाकीत, यंदा सारेच अपयशी ठरल्याने शेती पाण्यात गेली आहे. नुकसानभरपाईच्या प्रतीक्षेत शेतकरी सरकारकडे आर्जव करीत आहे.

## महाड शहरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांवर शेती करायची का ?

# गणेशोत्सवापूर्वी शहरातील खड्ड्यांची तातडीने दुरुस्ती करा ; मनसेचा मुख्याधिकाऱ्यांना इशारा

**दै.रायगड नगरी । महाड**

महाड शहर हे ऐतिहासिक नगरी असून या शहरातील मुख्य रस्त्याविषयी शहरातील अंतर्गत रस्त्यांवर देखील मोठ्या प्रमाणावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्ड्यात अशी अवस्था झाली असून रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांवर शेती करायची का असा सवाल करीत गणेशोत्सवापूर्वी शहरातील रस्त्यांची तातडीने डागबुजी करा असा इशारा महाड शहर मनसे अध्यक्ष पंकज उमासरे यांनी महाडच्या मुख्याधिकाऱ्यांना दिला आहे



महाड शहर हे ऐतिहासिक नगरी असून शहरातील मुख्य रस्त्यांचे अंतर्गत रस्त्यांचे पावसाळ्यापूर्वी सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांवर डांबरीकरण करण्यात आले होते मात्र पावसाळा सुरू झाल्यापासून सर्वच रस्त्यांवर महाडमध्ये खड्डे पडले या खड्ड्यातून मार्ग काढताना वाहन चालकांसहित रिक्षा चालकांना देखील मोठी तारेवरची कसरत करावी लागत आहे मागील आठ दिवसांपूर्वी देखील महाड रिक्षा चालक-मालक संघटनेने महाड शहरातील पडलेल्या रस्त्यांवरील खड्डे तातडीने भरण्याची मागणी नगरपालिका प्रशासनाकडे करून देखील त्यांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने शहरात मोठ्या प्रमाणावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे

महाड शहरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांबाबत बोलताना मनसे शहर अध्यक्ष पंकज उमासरे म्हणाले की दस्तुरी नाका परिसर असू द्या नाहीतर महाड एसटी स्टँड चा परिसर असू द्या खूप मोठे मोठे खड्डे पडलेत येणारा जाणारे नागरिक असू द्या शाळेचे, महाविद्यालयाचे विद्यार्थी असू द्या सगळ्यांची.

गैरसोय रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे होते मला आपल्या महाड नगरीचे हे ऐतिहासिक नगरीचे मुख्याधिकारी यांना एकच प्रश्न विचारायचा आहे की हे असे खड्डे पडतातच कसे हे खड्ड्यांची शेती चालू आहे का किंवा हा नक्की ठेकेदार कोण आहे या ठेकेदाराने डांबरीकरण करताना यामध्ये डांबर टाकलीच नाही का नक्की ही डांबर खाल्ली कुणी? आम्हाला तुमच्या मार्फत मोठा प्रश्न पडलेला आहे की सण तोंडावर आलेत मी भले भले मोठे खड्डे पडलेत हे तुम्ही बुजवणार कधी? का अशीच फक्त पावसाळा आला की अगोदर खड्डे करायचे आणि परत पावसाळ्या गेल्यानंतर खड्डे भरायचे हे अशी खड्डे ची शेती तुम्ही किती दिवस चालवणार मला या प्रश्नाचे उत्तर द्यायचं हे नागरिकांच्या हितासाठी चाललेला आहे हे सगळे खड्डे तुम्ही गणेशोत्सवाच्या आधी भरून दिले नाहीत आणि नागरिक समाधानी झाले नाहीत तर नागरिकांच्या हितासाठी महाडमध्ये आंदोलन घेण्याचा इशारा देत या आंदोलनाला जबाबदार महाड नगर परिषदेचे मुख्य अधिकारी असतील असा इशारा मनसे शहराध्यक्ष पंकज उमासरे यांनी दिला आहे.


### वाचकांसाठी विनम्र सूचना

'दै.रायगड नगरी' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध प्रकारच्या जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनासंदर्भात वा सेवेसंदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'दै.रायगड नगरी' वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


### जाहीर नोटीस

या सदर नोटीस द्वारे तमाम जनतेस कळवितात कि, आमचे अशील श्रीमती. शेवंती शंकर ठाकूर, वय ५४ वर्षे, गावदेवी येथे राहणारे मंदिर मार्ग, सेक्टर क्रमांक १९, मुरबी गाव, पोस्ट. खारघर, नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२१० हे खालील वर्णणाची मिळकत १) श्रीमती. दिप्ती महेश नारकर, वय ३५ वर्षे, (२) श्री . प्रसाद दयानंद पंगम, वय ३१ वर्षे, दोन्ही भारतीय रहिवासी, ए-६०१ येथे राहणार, कन्हाई गोपाल सोसायटी ., प्लॉट क्र. ९ सी, सेक्टर क्रमांक २० नीलकंठ स्वीट्स जवळ, खारघर, नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२१०,याचे कडून विकत घेत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**प्लॉट क्रमांक ए-३२/३१, क्षेत्रफळ-३६.०५ चौ.मी. तळमजला, (३३.१२ चौ.मी. आकाराचा बांधलेला क्षेत्रफळ), सेक्टर क्रमांक १२, खारघर, मुंबई, ता.पनवेल, जिल्हा. रायगड**

तरी सदर भुखंडा बाबत, कोणाचाही कोणत्याही भागावर, गहाण, दान, बक्षीस,फरोक्त,तारण,भाडेकरू हक्क, साठे करार, मुखत्यारपत्र, सामंजस्य करार किंवा यासारखे कोणतेही दावे, मालकी किंवा इतर कोणत्याही प्रकारचे योग्य हितसंबंध असल्यास, उक्त व्यक्ती किंवा संबंधित ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपला हक्क हितसंबध असल्यास कागदोपत्री पुराव्यासह खाली स्वाक्षरी केलेल्या पत्त्यावर लेखी कळवावे. अगर समक्ष येऊन भेटावे.वरील विहित कालावधीत कोणाचाही आक्षेप किंवा तक्रार नसल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असुन त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा हक्क ,हितसंबध नाही असे समजुन आमचे अशिल सदर भुखंडाचा व्यवहार पुर्ण कर्ती व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडुन दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकानी नोंद घ्यावी.

दिनांक : २१/०८/२०२५

**सही/-**
**ॲड. श्रीमती रेखा होवाळे**
**ऑफिस नं. १३, प्रभात सेंटर**
**सीबीडी बेलापूर, नवी मुंबई**
**मोबाईल ८३६९०१७३६३**

मा.जागुष्टे सो
वकील निर्मला साळुंखे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१०५६/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.१९/०९/२०२५

श्रीमती.उषा रामदास समगिर व इतर २ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, कै. रामदास नामदेव समगिर हे कामोठे येथील कायमस्वरूपी रहिवासी होते. यांचे दिनांक २०/०२/२०२५ रोजी एम.जी.एम. हॉस्पीटल, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड, येथे निधन झाल्याने अर्जदार यांनी कै. रामदास नामदेव समगिर यांच्या नावे असलेल्या खालील मिळकतीचे वारसपत्र मिळणेकामी अर्ज केला आहे.

**परिशिष्ठ 'अ' मिळकतीचे वर्णन**

**सदनिका क. २०३, दुसरा मजला, बी-विंग, जैन पार्क को. ऑप. हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं. १२ व १३, सेक्टर-३६, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६. क्षेत्रफळ ३८.६१ चौ.मी. बांधीव**

वरील अर्जदार क्र. १. श्रीमती उषा रामदास समगिर, अर्जदार क्र. २ श्री. प्रणित रामदास समगिर व अर्जदार क्र. ३. सौ. कोमल रोहित सावंत हे कै. रामदास नामदेव समगिर हयांचे कायदेशीर वारस आहेत. या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहुन हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत. तर हे मे. कोर्ट वरील अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते अर्जदार यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत हे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजुर करेल. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक १८/०८/२००५ राजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

## ढोल-ताशा पथकांचा सराव अंतिम टप्प्यात

# सार्वजनिक मंडळांचीही सजावटीसाठी जोरदार तयारी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गणेशोत्सवाचे आगमन आता अवघ्या काही दिवसांवर आले आहे. त्यामुळे पनवेल परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण होऊ लागले आहे. गणेशोत्सवासाठी पनवेल , नवीन पनवेल , करंजाडे , कामोठे , खांदा वसाहत या भागांतील विविध गणेशोत्सव मंडळे तयारीला लागली आहेत. तर दुसरीकडे गणेशाचे आगमन व विसर्जन करतेवेळी गणेशभक्तांना तालात ठेका धरण्यास भाग पाडणारी ढोल-ताशा पथकांनी आपला सराव जोरात सुरू केल्याचे दिसून येत आहे.

पनवेल परिसरातील विविध उड्डाणपुलांखाली, मोकळ्या जागा, काही ठिकाणच्या मैदानात ही ढोल-ताशा पथके आपल्या सहकाऱ्यांसह सकाळ-संध्याकाळ येथे सराव करताना दिसत आहेत. ही पथके ढोल-ताशा, झांज यांचा एक विशिष्ट ताल धरण्यासाठी गेल्या महिन्याभरापासून सराव करत आहेत. त्यासाठी काही पथकांना यंदा नवीन वाद्यसामग्री खरेदी केल्याचे पहायला मिळत असून, त्यातून ते पारंपरिक व आधुनिक तालांचा संगम साधण्याचा प्रयत्न करत आहेत.गणेशोत्सवात भव्य मिरवणुका, आगमन व विसर्जन सोहळ्यात ढोल-ताशांचा गजर महत्त्वाचा मानला जातो. ढोल-ताशांचा गजर नसेल तर गणरायाचे आगमन आणि विसर्जन काय कामाचे, असे सारी गणेश मंडळा मानतात. त्यामुळे सर्वोत्तम वादन करणाऱ्या ढोल-ताशा पथकांच्या शोधात गणेश मंडळ असतात. त्यांच्या कानावर आपल्या सरावाचा ठेका पडावा व गणरायाच्या आगमनाची व विसर्जनाची ऑर्डर आपल्याला मिळावी, यासाठी ही ढोल-ताशा पथके अधिकाधिक सराव करत असल्याचे वास्तव पनवेल परिसरात ठिकठिकाणी समोर येत आहे. दरम्यान, त्यांच्या सरावाचा ताल कानावर पडू लागताच आजूबाजूचे नागरिकदेखील स्वतःचे मनोरंजन करण्यासाठी तेथे गर्दी करताना पहायला मिळत आहेत. त्यामुळे या पथकांच्या उत्साहात भर पडत असून, ते अधिकाधिक चांगला सराव करताना दिसत आहेत.त्यातच अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी आतापासूनच मंडपाची सजावट व परिसरात विद्युत रोषणाई करून गणेशोत्सवाचा आनंद लुटण्याची तयारी सुरू केली आहे. त्यातच सकाळ संध्याकाळी ढोल-ताशा पथकांच्या सरावाचा नाद नागरिकांच्या कानावर पडत असल्याने नवी मुंबई परिसरात यंदा गणेशोत्सव मोठ्या थाटात साजरा होणार असल्याचे चित्र आहे.




### गाळा विकणे आहे

**नवीन कोर्टा समोर दुकानी (शॉप) ६५० स्के फुट गाळा विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा.**

**9892181313**


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत अरुण लडग्या म्हात्रे व इतर यांच्या मालकी हक्क व कब्जे वहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे.

असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ (एकविस) दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहेत. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे पिरकोन येथील मिळकत भूमापन नं. १८१/४/क यांसी एकूण क्षेत्र ०.३९.२० हे. आर. प्र. व पोटखराबा ०.०३.६० हे. आर. प्र., यांसी आकार रक्कम रुपये ५.९४ पैसे, यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीख : २२ ऑगस्ट २०२५

**सही/-**
**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारातर्फे वकिल ३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२**

मा.हंगरगेकर साहेब कोर्ट
प्रोसेस जमा ५०/- — अर्जदारतर्फे वकील ॲड.वर्षा पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश व स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.७११/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.२९/०९/२०२५

१. श्रीमती. वैजंयता गणपत धनावडे
वय ५९. वर्षे, धंदा-गृहिणी
रा.पत्ता. मु पो मोहाट, ता. जावली, सातारा
२. श्री. योगेश गणपत धनावडे
वय ३९. वर्षे, धंदा-नोकरी
रा. गणपत धनावडे, के. एच-१/२९,
प्लॅट नं.२०१. दुसरा मजला, सेक्टर १,
खारघर, जि. रायगड, महाराष्ट्र ४१०२१०
३. श्री. शक्ती गणपत धनावडे
वय ३५. वर्षे, धंदा-नोकरी
रा. प्लॅट नं ई.९०५, सनफॅक्टासी, सर्वे नं.१२/१,
१३ लेकविस्टा सोसायटी जवल, आंबेगाव बुद्रुक,
पुणे सिटी, पुणे, महाराष्ट्र ४११०४६
४. सौ पुनम अभिजीत मर्डेकर (लग्नानंतर)
कु. पुनम गणपत धनावडे (लग्नाआधी)
वय ३३. वर्षे, धंदा-गहिणी
रा. अभिजीत मर्देकर, एन. एल-१/ए३०/७,
अण्णासाहेब पाटील रहिवासी गंघटना,
गुडविल, आरचडे, सेक्टर १०, व्हीटीसी,
नवी मुंबई, नेरूळ ०३, ४००७०६ — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, ज्या अर्थी कै. गणपत शंकर धनावडे हे मु. पो. मोहाट, ता जावली, जि. सातारा येथिल कायमस्वरूपी रहिवासी असून ते दिनांक १६/४/२०२४ रोजी मु. पो. मोहाट, ता जावली, जि. सातारा येथे मयत झालेले आहेत त्या अर्थी अर्जदार क्र १ ते ४ यांनी कै. गणपत शंकर धनावडे यांचे खालील प्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीच्या यांच्या हिस्साबाबत वारस असले बाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केला आहे.

**कै. गणपत शंकर धनावडे यांच्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे मौजे. सेक्टर ३६, प्लॉट नंबर -१ तलोजा नवी मुंबई**

**मौजे. सेक्टर ३६, प्लॉट नंबर -१ तलोजा नवी मुंबई येथिल प्लॅट नंबर १, बिल्डीग नं इ-०६, सहावा मजला, अपार्टमेंट नं ०६०५ तळोजे, ता. पनवेल, जि. रायगड येथिल सदनिका एकुन २५.६१ चौ फुट (कारपेट एरिया) तळोजे, ता. पनवेल**

त्या अर्थी अर्जदार हक्काबददल कोणत्याही व्यक्ती हरकत घ्यावयांची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटिस प्रसिदध झालेच्या तारेखेपासून एक महिन्याच्या आत, त्यांने में कोर्टात हजर होवून आपल्या हरकत घ्यावयाचे आहे. याद्वारे असे जाहीर करणेत येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार यांचे कोर्ट यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेण्याची कार्यवाही करील आणि ते कै. गणपत शंकर धनावडे यांचे वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यास वारसदाखला मंजुर करील यांची दखल घ्यावी.

आज दिनांक रोजी माझी सही, न्यायालयाच्या शिक्कासह दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

Hon'ble Court Badgujar Saheb
Process fee deposit Rs.50/-
Adv.Kiran D. Sawant

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION PANVEL, AT PANVEL
C.M.A.No.1138 of 2025
Exh No.7/D
N.D. 10/10/2025

1)MRS. SHASHI MADHO LAL
(DECEASED MOTHER)
1/1) MR. GAURAV MADHO LAL (SON)
AGED– 49YEARS,OCCUPATION-SERVICE
AADHAR NO. 830651035565
ADDRESS-M.B.LAL, 10,
MUNIRKA ENCLAVE NELSON
MANDELA MARG, OPP VASANTVIHAR,
POLICE STATION, MUNIRKA SOUTH
WEST, DELHI, PIN-110067.
1/2) MRS. ANGANA BAHADUR (DAUGHTER)
(BEFORE MARRIAGE NAME-
ANGANA MADHO LAL)
AGED– 54YEARS,
OCCUPATION– SELF-EMPLOYED
AADHAR NO. 390845042810
ADDRESS- HOUSE NO.5,
RAJ NARAIN ROAD, CIVIL LINES, DELHI,
NORTHDELHI DELHI, PIN-110054. APPLICANT
V/S
NONE RESPONDENTS

The applicants are the legally heirs of the Deceased APPLICANT'S MOTHER, DECEASED MRS.SHASHI MADHO LAL, DIED ON 19/01/2022, at Max Super Specialty Hospital, Saket, Max Super Specialty Hospital, 2, Press Enclave Road, Saket Institutional Area.Saket, New Delhi, Saket South Delhi, India, Pin-110017. and the applicants are the legal heirs of the deceased.

The Deceased Late MRS.SHASHI MADHO LAL had acquired immovable property mentioned herein below.

**PROPERTY DESCRIPTIONS**
**Kolkhe Village, Panvel, District Raigad.**

| Sr. No. | Name of the Building/Society | Flat No. | Floor | Area |
|---|---|---|---|---|
| 1 | Marina Tower, Building No. 1, Sai World City, Wing-A, Survey No. 95/1, 95/2, 95/3/A, 98/1, 98/2, 98/3, 98/4A, 98/4/B/1, 98/4/B/2, 98/5, 98/7/K, 98/8, 98/9, 98/10/A, 98/10/B, 99, 101/3, 101/4/A, 101/4/B, 101/4/C, 101/5, 101/6, 101/7, 101/8/A, 101/8/B, 1, At Kolkhe, Tal-Panvel, Dist. Raigad | 2304 | 23rd Floor | 671.35 Sq. Feet, Carpet Area |

Whereas the above named applicants has filed application for grant of Heirship Certificate AS PER THE PROVISIONS CONTAINED APPLICATION FOR GRANT OF HEIRSHIP CERTIFICATE UNDER CHAPTER VII OF THE BOMBAY REGULATION ACT 1827 in respect of abovementioned immovable property in the court of District Court and Additional session Judge Panvel.

And whereas if any person has any rights title or interest share any nature of whatsoever in the abovementioned immovable properties is hereby invited to submit his/her/ their objection in the court within a period of 30 days from the date of the publication of this public notice.

As such if nothing is received within the stipulated period of 30 days from the date of this public notice and if the applicants prove that they are the real heirs then Prayed shall be granted. Applicants shall be allowed Heirship Certificate. Given under the signature and seal of the court of this..... day of ......2025.

**Sd/-** **Jr.Clerk** **Civil Court S.D.** **Panvel** — (Court Seal) — **Sd/-** **Asst.Supted.** **Civil Court S.D.** **Panvel**

गणेशोत्सव हा राज्य महोत्सव

# राज्य महोत्सवांतर्गत उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा : ना.आशिष शेलार

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात सर्वत्र उत्साहात साजरा होणारा गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा केला जाणार आहे. या महोत्सवांतर्गत महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा राज्य, जिल्हा व तालुका स्तरावर घेण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार यांनी दिली.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आवश्यक अर्ज पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी (मुंबई) यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच ganeshotsav.pldmka.co.in या पोर्टलद्वारे ऑनलाइन स्वरूपात अर्ज स्वीकारले जाणार असून, अर्ज करण्याची अंतिम तारीख २५ऑगस्ट २०२५ निश्चित करण्यात आली आहे. ही स्पर्धा विनामूल्य असून नोंदणीकृत व परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात.

स्पर्धेत विजयी ठरणाऱ्या मंडळांना तालुकास्तरावर प्रथम, जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे गौरवचिन्ह प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय



महाराष्ट्रातील घरगुती गणपतींचे दर्शन, सार्वजनिक गणपतींचे दर्शन व विविध प्रसिद्ध गणेश मंदिरातील गणपतींचे तसेच मुंबईतील सुप्रसिद्ध लालबागचा राजा याचबरोबर राज्यातील विविध नामवंत सार्वजनिक गणेश मंडळांचे थेट लाईव्ह दर्शन अकादमीच्या वतीने तयार करण्यात आलेल्या ganeshotsav.pld-mka.co.in या पोर्टलव्दारे घरबसल्या घेता येणार आहे. आपल्या घरगुती अथवा सार्वजनिक गणेशोत्स-वाचे छायाचित्र या पोर्टलव्दारे विनामूल्य प्रसिध्द करता येतील. याकरिता अधिकाधिक मंडळांनी व कुटुंबांनी आपल्या गणपतीची छायाचित्रे ganeshotsav.pldmka.co.in या पोर्टलव्दारे प्रसिध्द करावी जेणेकरुन सर्वांना श्री गणरायाचे दर्शन घेता येईल.

मंत्री ॲड. अशिष शेलार यांनी यावेळी सर्व जिल्हा प्रशासन, पोलीस यंत्रणा, तसेच विविध शासकीय विभागांनी या उपक्रमाला सहकार्य करावे, असे आवाहन केले. राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना समाजोपयोगी उपक्रम राबविण्यास प्रोत्साहित करण्यासाठीच ही स्पर्धा महत्त्वाची ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सामाजिक व शैक्षणिक उपक्रम, महिला सबलीकरण, आरोग्य शिक्षण, वाचनालय उपक्रम, खेळ व सांस्कृतिक स्पर्धा, विज्ञान-तंत्रज्ञान प्रसार, पर्यावरणपूरक मूर्ती, प्रदूषणमुक्त वातावरण निर्मिती, सजावट व प्रदूषण रहित वातावरण अशा विविध घटकांच्या आधारे परीक्षक समितीमार्फत परीक्षण करण्यात येणार आहे.

या उपक्रमामुळे समाजातील सर्व स्तरांपर्यंत गणे-शोत्सवाचा सांस्कृतिक संदेश पोहोचून एक सकारात्मक वातावरण निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त करत या गणेशोत्सव स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी केले आहे.

गणेशोत्सव कालावधीत....

# राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वर १६ टनापेक्षा जास्त क्षमता असणाऱ्या सर्व वाहनांना पूर्णतः बंदी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

दि.२७ ऑगस्ट २०२५ पासून सुरु होणाऱ्या गणेशोत्सवाचे अनुषंगाने गणेशभक्त कल्याण, डोंबिवली, ठाणे, वसई, व मुंबई येथून मोठ्या प्रमाणावर कोकण व गोवा या भागात जाण्याकरिता खाजगी व प्रवासी वाहनांचा वापर करतात.

त्यामुळे या कालावधीत दोन्ही (पुणे व कोकणमार्गे) मार्गावर प्रचंड प्रमाणात बाहतुकीची वर्दळ वाढते. याकरिता गणेशोत्सव कालावधीत राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वर सर्व वाहने ज्यांची वजनक्षमता १६ टन किंवा १६ टनापेक्षा जास्त आहे.

(जड-अवजड वाहने, ट्रक, मल्टीएक्सल, ट्रेलर, लॉरी इ. वाहने) अशा वाहनाच्या वाहतुकीस पूर्णतः बंदी सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल निलेश धोटे यांनी लागू केली आहे.

दि.२३ ऑगस्ट २०२५ रोजी ००.०१ वाजेपासून ते दि.२८ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री २३.०० वाजेपर्यंत, दि. ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ०८.०० वाजेपासून ते रात्री २३.०० वाजेपर्यत आणि दि. ०२ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ०८.०० वाजेपासून ते रात्री २३.०० वाजेपर्यंत तसेच दि. ०६ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ०८.०० नंतर ते दि. ०७ सप्टेंबर २०२५ रोजी २०.०० वाजेपर्यंत या कालावधीत मुंबई गोवा या राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वर सर्व वाहने ज्यांची वजनक्षमता १६ टन किंवा १६ टनापेक्षा जास्त आहे. (जड-अवजड वाहने, ट्रक, मल्टीएक्सल, ट्रेलर, लॉरी इ. वाहने)यांची वाहतुक पूर्णतः बंद करण्यात येणार आहे.

जेएनपीटी बंदर व जयगड बंदर येथून आयात निर्यात मालाची वाहतूक करणारी वाहने दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस सिलेंडर, मेडीसीन, लिक्वीड मेडीकल ऑक्सीजन, अन्न-धान्य, भाजी-पाला, नाशवंत माल इ. जीवन आवश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या वाहनांना लागू राहणार नाही. तसेच मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ च्या रस्ता रुंदीकरण/रस्ता दुरुस्ती कामकाज इ. साठी लागणारे साहित्य ने-आण करणाऱ्या वाहनांना बंदी लागू राहणार नाही.

मात्र या संदर्भात वाहतूकदारांनी संबंधित वाहतूक विभाग/महामार्ग पोलीस यांच्याकडून प्रवेशपत्र घ्यावे असे त्यांनी प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

# अलिबाग आगाराच्या शिवशाही बस सतत ब्रेक डाऊन, प्रवाशांचे हाल

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग आगाराच्या शिवशाही बसगाड्या गेल्या काही दिवसांपासून वारंवार बिघाडामुळे ठप्प होत असून प्रवाशांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत आहेत.आज पुन्हा कार्लेखिंड ते पेझारी दरम्यान अलिबाग आगाराच्या तब्बल दोन शिवशाही बस मार्गातच ब्रेक डाऊन झाल्या.



दरम्यान, काल देखील कार्लेखिंड येथील पेट्रोल पंपाजवळ आणखी एक शिवशाही बस बंद पडल्याने प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला होता. सलग दोन-तीन दिवस बसगाड्या बंद पडत असल्याने प्रवाशांच्या मनात संताप व्यक्त होत आहे.

या बिघाडांमुळे नागरिकांच्या प्रवासाचा वेळ वाया जात असून विद्यार्थ्यांसह नोकरदार वर्गालाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. संबंधित बसच्या देखभालीकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा प्रवाशांत सुरू आहे. प्रवाशांनी तातडीने योग्य देखभाल करून नियमित व सुरक्षित सेवा सुरू करण्याची मागणी एस.टी. प्रशासनाकडे केली आहे.

# कापडे विभागात शिवसेनेच्यावतीने बांधकाम कामगार योजना कॅम्प उत्साहात

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

महाराष्ट्र शासनाच्या विविध लोकहिताय योजना बांधकाम कामगारांपर्यंत पोहोचाव्यात व त्यांचा सर्वसामान्य कामगारांना लाभ मिळावा या उद्देशाने, शिवसेना व युवा सेनेच्यावतीने एक विशेष कॅम्प पोलादपूर येथील कापडे विभागात आयोजित करण्यात आला.

या कॅम्पचे आयोजन रोहयो मंत्री नामदार भरत गोगावले यांच्या विशेष सहकार्याने व युवा सेना कोअर कमिटी सदस्य श्री. विकास शेठ गोगावले यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण विधानसभा क्षेत्रात योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीचा एक भाग म्हणून करण्यात आले.

या उपक्रमात रानबाजीरे व आदिवासी वाडी येथील असंघटित बांधकाम कामगारांना एकत्र करून, शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली व त्यांची बांधकाम कामगार योजनेत नोंदणी करून त्यांना अधिकृत लाभार्थी करण्यात आले.

कॅम्पमध्ये खालील योजनांची माहिती व नोंदणी सेवा काम योजनादूत समन्वयक श्री इंद्रनील पाटील यांनी बांधकाम कामगार योजना, घरेलू कामगार योजना, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना ,आयुष्मान भारत कार्ड अन्नपूर्णा योजना, फार्मर आयडी तयार करणे, पॅन कार्ड व आधार कार्ड अपडेट करणे ,,वयोश्री योजना,तीर्थदर्शन योजना याचीही माहिती दिली कार्यक्रमाचे स्थानिक शिवसैनिक व परिसरातील लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, अशा उपक्रमांमुळे शासनाच्या योजना खऱ्या अर्थाने शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

शेवटी उपस्थितांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा आणि भविष्यातील उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले.



# शिवकर येथे सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवकर येथील घरात चोराने प्रवेश करून ३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरी करून नेले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. चोर रेनकोट घालून आलेले दिसत आहेत. चोरीची ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

पनवेल तालुक्यात चोरांनी थैमान मांडला आहे. नेरे, नांदगाव पाठोपाठ शिवकर येथे देखील चोरांनी चोरी केली आहे. चोरीच्या घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेले असल्या तरी देखील या चोरांचा कायमचा बंदोबस्त करण्यात पोलीस अपयशी ठरत आहेत. वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिक भयभीत झाले आहेत. लवकरच गणपती बाप्पांचे आगमन घरोघरी होणार आहे यापूर्वी या चोरांना अटक करण्याची मागणी केली जात आहे. सावित्री पाटील या शिवकर येथे राहत असून त्यांच्या राहत्या घराच्या दरवाजाचा कडीकोयंडा तोडून चोरांनी आत प्रवेश केला आणि त्यांच्या लाकडी कपाटाच्या लॉकर मधून सोन्याचे कानातले टॉप, सोन्याची चैन, सोन्याच्या अंगठ्या आणि सोन्याचे मंगळसूत्र असा एकूण ३० ग्रॅम वजनाचा सोन्याचे दागिने चोरून नेले. आई काळूबाई चायनीज कॉर्नरमधून रोख रककमेची चोरी केली. यावेळी काळूबाईच्या फोटोजवळ असलेले जवळपास दीड हजार रुपयांना चोरांनी हात देखील लावला नाही. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत असून या चोरांना लवकरात लवकर अटक करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

# पोलादपूर शहरात भैरवनाथ नगर येथे वीजवाहक तारावर फांद्या लोंबकळल्या

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा महामार्गालगतच्या पूर्वे कडील सर्व्हिस रोडला जोडलेल्या आनंदनगर व भैरवनाथनगर रस्त्यावर मंगळवारी सायंकाळी एक उंच झाड अर्ध्यावर तुटून कोसळले आणि वीजव-हक तारांवर या झाडाच्या फांद्या लोंबकळू लागल्याने स्ट्रीटलाईटस काहीकाळ बंद ठेऊन फांद्या हटवाव्या लागल्या.

पोलादपूर शहरातील भैरवनाथ नगर आनंदनगरकडून सहाणेजवळून महामार्गाकडे जाणाऱ्या रस्त्यावर विजय रामू पवार यांच्या घराजवळील झाडाची फांदी तुटून रस्त्यावर पडल्याने काही काळ वाहतुकीला अडथळा निर्माण झाला. यावेळी नगरपंचायत कर्मचारी निलेश मोरे व प्रमोद शिंदे यांनी झाडाच्या फांद्या तोडून रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्यासाठी प्रयत्न सुरू केला. यादरम्यान नगरसेवक स्वप्निल भुवड व राजू पार्टे यांनी महावितरणशी संपर्क साधून झाडाची फांदी तुटल्याची माहिती दिली. पार्टे यांच्या घराशेजारील वीजेच्या खांबावरील वीजवाहक तारांवर झाडांच्या फांद्या लोंबत अधांतरी असल्याचे दिसून आल्याने या परिसरातील जनतेच्या जीविताला धोका निर्माण झाल्याचे उघड झाले.

महावितरणकडून मे महिन्यादरम्यान पावसाळापूर्व कामे सुरू होत असताना वीजवाहक तारांवरून जार्णाय़ा फांद्या दूर्लक्षित राहिल्याने महावितरणकडून या झाडांच्या फांद्यांची छाटणी टाळली गेल्याने संतप्त भावना व्यक्त झाल्या. यादरम्यान, पोलादपूर शहरातील वीजेच्या खांबावरील विद्युतप्रकाशझोत बंद ठेवण्यात आले होते.



# न्हावा येथील लेडी खातून मरियम विद्यालयात न्हावा प्रकल्पांतर्गत सायबर गुन्हे, सुरक्षा व रस्ते वाहतूक उपक्रम



**दै.रायगड नगरी । उरण**

न्हावा लेडी खातून मरियम विद्यालय मध्ये काल गुरुवार २१ ऑगस्ट रोजी सायबर सुरक्षा व रोड सेफ्टीवर विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी या विषयावर न्हावाशेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम मुजावर तसेच सायबर गुन्हे व डिजिटल फॉरेन्सिक विशेषज्ज्ञ विदाश्री भांगे यांचे अभ्यासपूर्ण समुपदेशन संपन्न झाले. न्हावाशेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम.मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली व लेडी खातून मरियम अंतर्गत संपन्न झालेल्या या समुपदेशन शिबीरास न्हावाशेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम.मुजावर तसेच हवालदार किरण म्हात्रे व मोरे ,कर्मचारी सचिन ठाकूर विद्यालयाच्या प्राचार्या दैसम्मा पॉल,उपमुख्याध्यापक प्रियरंजन त्रिपाठी, पर्यवेक्षक जितेंद्र महाजन आदी उपस्थित होते.

सायबर गुन्हे व डिजिटल फॉरेन्सिक विशेषज्ञ विदाश्री भांगे यांनी फेसबुक ,स्नॅपचॅट, व्हाट्सअप,इंस्टाग्राम याद्वारे होणाऱ्या गुन्ह्यांबद्दल माहिती दिली. आज मोठ्या प्रमाणात तीन पत्ती रम्मी ऑनलाइन खेळली जाते. यामुळे अनेक विद्यार्थी या जाळ्यामध्ये कसे अडकले आहेत याबद्दल माहिती दिली. एखादा गुन्हा घडल्यास त्यानंतर कोणती काळजी घ्यावी,

आपल्याकडून कोणताही गुन्हा घडला नसेल तर सायबर हेल्पलाइनची मदत घेणे, कसे आवश्यक आहे. या विषयी विस्ताराने माहिती देऊन समुपदेशन केले.

विद्यार्थ्यांनी मोबाईल वापरताना विशेष काळजी घेण्याची आवश्यकता प्रतिपादन करताना एखादा अनोळखी प डाऊनलोड करणे,एखादी अनोळखी वेबसाईट लिंक ओपन करणे टाळावे तसेच सोशल मीडियावरील अवैध अमिषाला बळी पडू नये असाही असा सल्ला दिला.

यावेळी वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी. एम.मुजावर यांनी दुचाकी वाहनस्वारास हेल्मेटची अनिवार्यता तसेच रस्ता ओलांडताना सिग्नलचे ज्ञान व विविध वाहतूक चिन्हांची माहिती दिली. तसेच रस्त्यावर होणाऱ्या अपघाताबद्दल माहिती सांगितली व अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी या विषयी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक,सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ज्येष्ठ शिक्षक जितेंद्र महाजन यांनी केले.

# पनवेल येथे उद्योग सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे जिल्हा उद्योग केंद्र रायगड व लघु उद्योग भारती, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्ह्या-तील सर्व उद्योजकांसाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत उद्योग सुसंवाद-२०२५ या कार्यक्रमाचे सकाळी ११.०० वा आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणा, उद्योजक यांनी उपस्थितीत राहावे, असे आ-वाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस. हरळया यांनी केले आहे.

या कार्यक्रमास जिल्हा पोलीस अधिक्षक आचल दलाल, मुख्य कार्यकारी अधिकारी, नेहा भोसले आयुक्त, पनवेल महानगर पालिका, मंगेश चितळे व जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस. हरळया तसेच जिल्ह्यातील सुमारे ३००-४०० उद्य-ोजक उपस्थितीत राहणार आहेत.

# शेडुंग ते बेलवलीकडे जाणाऱ्या रस्त्याची चाळण, डागडूजी करण्याची शेकापची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शेडुंग पासून ते बेलवली कडे जाण-ारा रस्ता खड्ड्यात हरवल्याने त्याची डागडुजी करण्याची मागणी शेकापचे चिटणीस मंडळ सदस्य पनवेल तालुका, वसंत काशिनाथ फडके यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायत भिंगार मधील शेडुंग ते बेलवली कडे जाणारा रस्ता खराब झालेला आहे. या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. रस्त्यावरील डांबर गायब झालेली आहे. गणपती उत्सव आठवड्याभरात सुरू होणार आहे. त्यामुळे या खराब रस्त्यामुळे नागरिक बाजारहाट करण्यासाठी जाताना त्यांची मोठी गैरसोय होत आहे. खड्डे चुकवताना नागरिकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्याकरता रस्त्याची तातडीने दुरुस्ती करणे गरजेचे आहे. या रस्त्याची ताबडतोब डागडूजी करून खराब रस्ता चांगला बनवावा अशी मागणी वसंत फडके यांनी केली आहे.

